NOTARIAL REG
ENTRY NO 1883
DATE 11/04/2025

AMITA J. AWASTHI Dist. NAGPUR (M.S.) INDIA Regd. No. 30686 GOVT. OF INDIA

# Office, Department of Education (Primary), Zilla Parishad, Civil Lines, Nagpur

## RTE - Namuna-2

Village : Nagpur city
Phone :- 0712-2560902
E Mail :- mdmnagpur15@gmai.com

Outward No.: ZP.Ngp/RTE/Sh.M./Ka no.25B/2204/2025
Office, Education Officer (Primary),
Zilla Parishad, Nagpur
Division Nagpur, State - Maharashtra.
Dated: 12/03/2025

To,
President/Secretary,
Podar Education Society, Mumbai.

Subject :- School Recognition certificate under Right to Education Act, 2009, Section 18, For the purpose, sub-rules in the Right of Students to Free and Compulsory Education Rules, 2011 (4) Regarding grant of recognition certificate to schools.

With reference to your application dated 14.12.2023 in the above subject and on the basis of subsequent correspondence with the school/inspection of the school, **I, Siddheshwar Kaluse, Education Officer (Primary), Zilla Parishad Nagpur, for a period of three years from 01.04.2025 to 31.03.2028 for Class 1 to 8, Podar International School, Godhani (Railway), Pt. Dist. Nagpur (Medium English)** School is being granted **provisional recognition certificate**.

The above approval is subject to the fulfillment of the following conditions.

1. The period of recognition shall not be extended and there shall be no obligation under any circumstances to grant recognition or affiliation after Class VIII.

2. The school shall comply with the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (enclosure 01) and the Maharashtra State Right of Education Act, 2011 (enclosure 02).

3. The school will admit the BPL Students from nearby residential area in Std 01 with the number equal to 25% of the actual students in Std 01 and will continue their free education till they complete the Primary classes. The same rule will be application for Pre-Primary section also.

4. The reimbursement of the fees of Students admitted as per the above clause 3,will be done to school as per the RTE Rule 12(2) and for this reimbursement the school will be allotted with separate bank account.

5. The Organization / School is not charge any capitation fee. and shall not compel the Students as well as parents for the admission under RTE.
6. No child shall be denied admission to school on account of lack of proof of age, religion, caste or race, place of birth or any of these.

7. (1) Once admitted No Child will be failed in the same class and/Or removed from school till he/she completes the Primary education.

(2) No child is physically or mentally abused.

(3) No child is required to pass the examination of any Board until he has completed his primary education.

(4) Every child who has completed primary education shall be given the certificate prescribed under rule 23.

(5) Students with physically handicapped / special needs will be included as per the provisions of the Act.

(6) Teachers possessing the minimum qualification prescribed under section 23 (1) of the Act shall be appointed. Provided further that the teachers holding the minimum qualification on the date of commencement of the Act shall acquire such minimum qualification within a period of 5 years.

(7) Teachers will follow the duties mentioned as per the Act clause 24(1).

(8) No Teachers is allowed to take private tuitions and school will keep a check on this.

8. The school shall follow the syllabus prepared on the basis of the syllabus prescribed by the appropriate authority.

9. The school will allow the admissions on the basis of RTE Rule 19.

10. The school will follow all the rules and regulations mentioned in RTE clause 19. The following details were found during last inspection of the school-

| | |
|---|---|
| 1- School Total Area | 87187 Sq.ft. |
| 2- School Constructed Area | 67295.97 Sq. ft. |
| 3- Play ground Area | 64980 Sq.ft. |
| 4- Total Number of rooms in the School | 104 |
| Number of Classrooms | 82 |
| 5- Office, Store, Principal's cabin | Available |
| 6- Separate toilets for boys and girls with sufficient water for use and keep the toilets clean and hygienic: | Available |

( No. of toilets for boys- 11 and No. of Urinals-46 )
( No. of toilets for Girls - 36 and No. of Urinals-36 )

| | |
|---|---|
| 7- Drinking water facility | Available |
| 8- Kitchen for Mid-day Meal facility | NA |
| 9- Teaching – study material/games and sports equipment Availability of Library: | Available ( Cricket Kit, badminton, Football,) ( Social Science, mathematics Laboratory, robotics lab). |
| 10-Easy access to library and reading material | Available ( No. of books-8290) |
| 11-Easy access to all facilities | Available |
| 12-Compound wall to school building | Available |

11. School is not allowed to conduct classes for section and standards not permitted, either in the school premises or anywhere.

12. School building, other construction and play ground will be only used for educational and all round development.

13. School will be run by the Education trust enrolled under Society Enrollment Act 1860 (21 of 1860) or Mumbai Social Trust Management Act 1950.

14. The school is not run for the personal, individual and /Or group profit making purpose.

15. The School accounts must be checked and certified by practicing Chartered Accountant and the details account records are to be prepared and maintained as per the rules. One copy of yearly account statement is to be submitted to District Education officer.

16. The UDISE allotted to your school number is **27090908411**, and it must be mentioned hereafter in future correspondence.

17. The school must be able to produce the reports and documents as and when asked by the Education Department and Education Officer and follow all the rules and regulations required for flawless working and must follow the instructions given by the Government or the local authority.

18. Any renewal related to school will be done regularly and conveyed to the District Education Department.

19. School must complete all the required procedures related to RTE Act 2009 before 31.03.2028, otherwise the school recognition will not be continued in future.

(**Siddheshwar Kaluse**)
Education Officer (Primary)
Zilla Parishad, Nagpur

Transcript:
Principal, Podar International School, Godhani (Railway), Tah. Dist Nagpur (Medium-English) School forwarded for the information.

Education Officer (Primary)
Zilla Parishad, Nagpur

NOTARY AMITA D. AWASTHI Dist. NAGPUR (M.S.) INDIA Regd. No. 30686 GOVT. OF INDIA

ATTESTED
AMITA D. AWASTHI
NOTARY
NAGPUR DIST. M.S. INDIA

FIVE RUPEES NOTARIAL | FIVE RUPEES NOTARIAL | FIVE RUPEES NOTARIAL | FIVE RUPEES NOTARIAL | FIVE RUPEES NOTARIAL

**कार्यालय, शिक्षण विभाग (प्राथ.). जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन, नागपूर**

-: नमुना-दोन :-

2204

**ग्राम : नागपूर शहर**
दुरध्वनी : ०७१२-२५६०९०२
ई मेल :- mdmnagpur१५@gmail.com
फॅक्स :- ०७१२-२५६०९०२

जावक क्र.जि प ना प्रा/RTE/शा.मा./का क्र.२५ब/ /२०२५
कार्यालय:जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.)जिल्हा परिषद नागपूर
विभाग: नागपूर, राज्य-महाराष्ट्र
दिनांक :- 12/03/२०२५

**प्रति,**

**अध्यक्ष/ सचिव,**
**पोद्दार एज्युकेशन सोसायटी, मुंबई**

**विषय:- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व्र सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११ पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपल्या **दिनांक १४.१२.२०२३** च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी या आधारे **मी सिध्देश्वर काळूसे,** शिक्षणाधिकारी **(प्राथ.) जिल्हा परिषद नागपूर दिनांक ०१.०४.२०२५ पासून दिनांक ३१.०३.२०२८** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ते ८** करीता **पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, गोधनी, (रेल्वे), ता. जि. नागपूर (इंग्रजी- माध्यम)** शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संजग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२) बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्रा एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतूदीचे शाळा पालन करील.

३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संस्थेच्या किमान २५ टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४) परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल .अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्रा बँक खाते देण्यात येईल.

५) संस्था/ शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा तिच्या माता - पित्यास किंवा पालकाकांना भाग पाडणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म जात किंवा वंश जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) (१) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यास येणार नाही.

(२) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(३) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(४) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(५) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(६) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल परंतु आणखी असे की अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमांन अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(७) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

(८) शिक्षकाने/ शिक्षिकाने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुतवून घेऊ नये याची सुनिश्चिती शाळा करील.

८) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

१. शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- ८७१८७ चौ. फुट

२. एकूण बांधकाम क्षेत्रफळ:- ६७२९५.९७ चौ. फुट

३. खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ:- ६४९८० चौ. फुट

४. शाळेतील एकुण खोल्याची संख्या :- १०४ **वर्ग खोल्याची संख्या :- ८२**

५. कार्यालय नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली:- **आहे.**

६. मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल:-**आहे.** (मुलांसाठी स्वच्छता गृहाची संख्या-११ व मुत्रीघराची संख्या-४६ ) (मुलींसाठी स्वच्छता गृहाची संख्या-३६ व मुत्रीघराची संख्या-३६ )

७. पिण्याची पाण्याची सुविधा:- **आहे**.

८. दुपारचे जेवन शिजविण्यासाठी स्वयंपाकघर:- **नाही.**

९. अध्यापन-अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामग्री ग्रंथालय यांची उपलब्धता :-**आहे.** (क्रिकेट किट, बेडमिंटन, फुटबॉल,) (सामाजिक विज्ञान, गणित प्रयोगशाळा, रोबोटिक्स लॅब )

१०. वाचन साहित्य् विनासायस उपलब्ध:- **आहे.** (पुस्तकाची संख्या-८२९० )

११. सर्व सुविधा विना अडथळा उपलब्ध आहेत काय?:- **आहे.**

१२. शाळेला संरक्षण भिंत आहे काय:- **आहे.**

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०(१८६० चा २१) किंवा मुबई सार्वजनिक विश्र्वस्त् व्यस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्तीसंधाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणत्याही नफा मिळण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षत व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक **२७०९०९०८४११** असा आहे. हा या कार्यालयाशी कोणत्याही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा यांची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासयाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नूतनीकरण असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९) बालकांच्या मोफत व सकतीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ प्रमाणे शाळेला आवश्यक असणा-या **उपरोक्त त्रुटीची पुर्तता दिनांक ३१.०३.२०२८ पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात अन्यथा आपल्या शाळेची मान्यता त्यापुढे आपोआप संपुष्टात येईल.**

**(सिध्देश्वर काळूसे)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर**

**प्रतिलीपी :-**

**मुख्याध्यापक, पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, गोधनी, (रेल्वे), ता. जि. नागपूर (इंग्रजी- माध्यम) शाळेस यांना माहीतीस अग्रेषित.**

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर